
# परिशिष्ट

१) वसंत नरहर फेणे यांचा फोटो

२) वसंत नरहर फेणे यांची एक मुलाखत

## ज्येष्ठ लेखक वसंत नरहर फेणे



जन्म दिनांक : २८ एप्रिल १९२६

# परिशिष्ट -

## वसंत नरहर फेणे यांची एक मुलाखत

### (जी. के. ऐनापुरे यांनी घेतलेली एक मुलाखत)

**प्रश्न १ - सर आपल्या लेखनाकडे वळण्यापूर्वी आपल्या एकूण जडणघडणीबद्दल म्हणजे बालपण शिक्षण व याबद्दल सांगाल काय ?**

माझं मुळ गाव कारवारपासून दक्षिणेला सहा मैलावर असलेले चेंडिये हे गाव. तिथं आमचं मातीच्या भितींच व गवताने शाकारलेले घर होतं. तिथं मी कधीच राहिलो नाही. माझा जन्म समाजाच्या तथा कथित अभिजन वर्गातला साऱ्याप्रमाणे जन्माने लाभलेला सामाजिक स्तर व काळ यामुळेच माझंसुद्धा जीवन घडलं.

माझा जन्म मुंबईचं उपनगर असलेल्या जोगेश्वरी येथील १, सरस्वती बाग येथे २८ एप्रिल १९२६ रोजी झाला. १९२८ च्या अखेरीस वडिलांनी दिल्ली येथील 'देहली क्लॉथ मिल' मध्ये नोकरी धरली. कुटुंबकबिला मार्च २९ च्या अखेरीस दिल्लीला गेला. तेथे ४ मेला वडिलांच निधन झालं. (त्या दिवशी मी ३ वर्ष ६ दिवसाचा होतो.) आम्ही त्यांच्या निधनानंतर लगेच जोगेश्वरीला परतलो. दिल्लीच्या दीड दोन महिन्याचा अपवाद वगळता माझी चार वर्ष जोगेश्वरीत गेली.

माझं चवथं वर्ष पूर्ण होता होताच म्हणजे सन १९३० मार्च एप्रिलमध्ये आम्ही कारवारला आलो. कारवारला माझं दहा वर्षाचं वास्तव्य झालं. या काळातील बऱ्याच आठवणी आहेत. पण मी वाचन लेखनाशी निगडीत अशाच बाबींचा या ठिकाणी उल्लेख करीन.

आता शिक्षणाबद्दल बोलायचं झालं तर समाजाच्या ज्या भागात ज्या स्तरात आणि ज्या काळात मी जन्मलो होतो त्याचा विचार करता मी किमान मॅट्रीकपर्यंतच शिक्षण घेणार हे उघड होतं. मी १९४४ साली 'किंग जॉर्ज'मधून मॅट्रीक झालो. तेंव्हा आईनं कारवारला बिऱ्हाड करायच आणि मी कारवारला मिळेल ती नोकरी करायचं असं ठरलं म्हणजे वडिलधाऱ्यांनीच ठरवलं. मी शिकायला बरा होतो. पण माझ्या

कॉलेज शिक्षणाचा विचार होणेचं शक्य नव्हत. कारण माझ्याहून मोठा भाऊ रामदास याला कॉलेजमध्ये घातलं होतं. पण त्याचा खर्च आमच्या कुटुंबाला परवडण्यासारखा नव्हता. म्हणून माझे मोठे मेहुणे तो खर्च स्वत: करीत होते. पण तरीही त्यानं कॉलेजला रामराम ठोकून १९४२ च्या लढ्यात उडी घेतली आणि मी मॅट्रिकला असताना तो विसापूरच्या तुरुंगात होता. अशावेळी माझ्या कॉलेज शिक्षणाबद्दल कुणी विचार करणंही शक्य नव्हतं. मॅट्रीक पास झाल्यानंतर नोकरीची खटपट करायची होती. रिझल्टच्या दिवशीही मला काही उत्सुकता नव्हती. तेव्हाही प्रथेप्रमाणं माझा (रामदासहूनही मोठा) भाऊ गुरुदासनं मी पास झाल्याची तार पाठविली. दोन तीन दिवसांनी कारवारला गेल्यावर मी ती वाचली.

त्यानंतर काही दिवसांनी तोडूरहून माझे विश्वनाथमामा आले आणि त्यानं बातमी दिली की तोडूरच्या पत्यावर माझा भाऊ गुरुदास याचं पत्र आलय. त्यात त्यानं लिहिलय की तू कारवारहून मुंबईला ये, तुला कॉलेजात जाता येईल. आपण ही तुला मदत करु. पत्राच्या खाली 'तुझा गुरुदास' अशी सही आहे. मला आणि माझ्यापेक्षा माझ्या आईला जास्त आनंद झाला. एकच झालं होतं. ते पत्र आणायला विश्वनाथमामा विसरला होता. त्या सुमारास गुरुदासला अधिक पगाराची नोकरी मिळाली होती. तेंव्हा हे सारं साऱ्यांनाच रितसर वाटलं. मी कॉलेज शिक्षणासाठी मुंबईला येत असल्याचं पत्र पाठवलं आणि कॉलेज सुरु झाल्यावर एक दोन दिवसांनी मी मुंबईला पोहचलो.

तोवर भावानं रुईयामध्ये प्रवेश मिळत नसल्याने विल्सन कॉलेजमध्ये माझ्यासाठी 'सायन्स साईड' ला प्रवेश घेतला होता. मुंबईत आल्यावर खुलासा झाला की मला गुरुदासनं पत्र लिहिलं नव्हतच. मी शिकायला येतो म्हटल्यावर मात्र त्यानं प्रवेश मिळवला. नंतर समजलं की तो पत्र आम्हाला ओरिएण्ट शाळेत पाचवीचे एक वर्ष शिकविणारे भा. वा. लाड यांनी लिहिलं होतं. कन्नडमधून शिक्षण घेतलेल्या विश्वनाथमामांनी, 'तुझा भा. वा. लाड' चे तुझा गुरुदास असं वाचलं होते, ''मला



SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

सायन्स आवडत नाही असं मी बिचकत बिचकत भावाला म्हटलंही पण साऱ्यांनीच आर्टसला आता कुठ स्कोपच नाही', म्हणून मला गप्प केलं, आणि मी कसा बसा बी. ए. स्सी. मुंबई विद्यापीठातून झालो.'' त्यानंतर काही वर्षांनी मी पुणे विद्यापीठातून बी. ए. ही पदवी घेतली.

**प्रश्न २- सर तुम्हाला लेखक होण्यासंबंधीचे संस्कार किंवा तुमची लेखक होण्याची इच्छा केंव्हापासून निर्माण झाली ?**

नेमकं कधीपासून ते सांगता येत नाही. पण लहानपणापासून मला लेखक व्हायचं होतं, आमच्या घरात आईपासून सर्वांनाच वाचनाची आवड होती. मराठी चौथीत असताना मी उष:काल ही कादंबरी वाचली. मी ती वाचण्यासाठी घेतली नव्हती. माझे भाऊ व एक बहीण ती वाचताना गुंग होऊन का जातात? हे पाहण्यासाठी मी ती सहज वाचत होतो आणि न कळत मी त्या कादंबरीत गुंतलो. मी कादंबरी वाचून पूर्ण केल्यावर आईला आनंद झाला होता हे आठवतं.

याच सुमारास मी लेखणीही चालू केली. चौथीच्या वर्गात रविंद्र कायकिणी नावाचा मुलगा माझ्या वर्गात होता. एकेदिवशी तो दालचिनीचे तुकडे घेवून आला होता. मी तेंव्हा 'दालचिनी'ही गोष्ट लिहिली. आणि शाळेतला प्रसंग हा त्या गोष्टीचा (वास्तववादी) पाया लिहिता लिहिताच मी त्या अर्धवट गोष्टीवर प्रचंड खुष झालो. मग ती सैपाकात गुंतलेल्या आईला वाचून दाखविली. पुढं काय लिहिणार असं तिनं मला विचारलं, तेंव्हापासून मी कथा लिहिण्याचा चंग बांधला.

याच सुमारास मी बागेतील एका कुमारवयीन मुलगीवर आंब्याच्या झाडाखाली बसून चक्क एक कविता लिहिली! तिचं शीर्षक होतं. 'हिंदभ्रूस' ही लिहायला कुणाचीही मदत घेतली नाही की ती कुणालाही दाखविली नाही. त्या कवितेतील 'न येवो परलोक तुज लुटाया', हा एकच चरण आठवतो.

वयाच्या अकराव्या वर्षीची एक आठवण घट्ट लक्षात आहे. माझ्या मोठ्या भावानं (तो सुमारे २० वर्षानी मोठा) कारवारला प्रसूतीसाठी आलेल्या पत्नीला दोन पुस्तकं पाठविली एक होत प्र. के. अत्रे यांचा 'भ्रमाचा भोपाळा' हे नाटक व दुसरं होतं माधवराव खं बागल याचा 'जुलूम' हा कथासंग्रह. नवीन पुस्तकांना जीवघेणा गंध असतो हे या पुस्तकांनीच मला समजलं. तेंव्हाच मी ठामपणं ठरवलं की 'मोठा झाल्यावर आपण माधवराव बागलांसारखंच लिहावं !".

**प्रश्न ३- लेखनाकडे कधी वळलात ? पहिल्यांदा काय लिहिलं ? कथा की कादंबरी ? तेच सुरुवातीला का लिहावसं वाटलं ?**

मी १९५१ च्या सुमारास कोल्हापूर येथे एसटीत नोकरीला लागलो. १९५६ अखेरीस माझी नाशिकला बदली झाली. तेंव्हा मी केवळ साहित्यप्रेमीच राहिलो होतो. सन १९५६-५७ पर्यंत म्हणजे सुमारे दीड दशकांच्या काळात नकळतच माणसांच्या जगण्याबद्दलचं भान वाढलं होतं. किंवा कोणतीही विचारसरणी परिपूर्ण असू शकेल का अशी शंकाही प्रामणिकपणे मनात येत होती. आणि त्या काळात नाशिकच्या सांस्कृतिक वातावरणाला एक नवं बाळसं प्राप्त होत होतं. आणि मग १९५९-६० साली म्हणजे वयाच्या तेहतीस चौतीसाव्या वर्षी मला वाटू लागलं की आणि आपण लिहायला पाहिजे म्हणजे आपण 'लेखक' व्हायला पाहिजे.

त्या काळात मी दोनचार टाकाऊ कविता आणि तेवढ्याच कथाही लिहिल्या. त्या 'गावकरी', रविवारच्या पुरवणीत प्रसिद्धही झाल्या. एक कथा पुण्याच्या 'मनोहर' मासिकात प्रसिद्ध झाली. कुणाचंही अनुकरण करायचं नाही असं मी कितीही म्हटलं तरी त्या काळात प्रसिद्ध होणाऱ्या बऱ्या वाईट कथांच्या अंगानंच माझं लिखाण जात

होत. श्री क्षेत्र नाशिकच्या 'सा. गावकरी' त प्रसिद्ध झालेली 'सामिष' ही पहिलीच गोष्ट असावी.

माझ्या लिखाणांमुळं एक चांगली गोष्ट झाली. मी नाशिकच्या त्यावेळच्या उद्योन्मुख अशा डॉ. चंद्रकांत वर्तक, मनोहर शहाणे, श्मामकांत शिवरामे, डॉ. सुधीर फडके, चंद्रकांत महामिने, माधव नावडीकर, शशिकांत टेंबे यांच्या संपर्कात आलो. आमची दर रविवारी दुपारी गावकरी कचेरीत बैठक होवू लागली या 'अनामिका' संस्थेने मला उर्जा दिली व साहित्यिक मित्र दिले.

१९६२ ला माझी मुंबईला बदली झाली. आणि मी लेखक होण्यासाठी कथा लिहितच राहिलो म्हणजे वास्तवात कथालेखन जमविण्यासाठी धडपडत राहिलो. या काळात माझ्या गोष्टी, दीपावली, वसुधा आणि वीणा यात प्रसिद्ध झाल्या.

या कथालेखनापूर्वी वर्षभर चक्क विनोदी लेखन केलं. ते /'मोहिनी' या मासिकात प्रसिद्धही झालं. त्या काळात कादंबरी लिहावं असं मनातही आलं नाही. मला झटपट लेखक व्हायचं होतं. आणि लेखक व्हायचा 'कथालेखन' हा सोपा मार्ग वाटला असावा.

**प्रश्न ४-लेखन करण्यात आपल्यावरील संस्काराचा अनुभवाचा वा अभिव्यक्त होण्याचा रेटा किंवा निकड किती ?**

अगदी खरं सागायचं म्हणजे संस्काराचा अनुभवाचा वा अभिव्यक्त होण्याचा रेटा किंवा असं काही नव्हत. 'लेखक व्हायची' उर्मीच जबरदस्त होती. लेखक व्हायच्या एकमेव इच्छेनं मी लिहू लागलो. त्या उर्मीबरोबरचं संलग्न अशी दुसरी इच्छा होती. ती म्हणजे कुणाही लेखकाचं माझ्याकडून अनुकरण होऊ नये.